## ३. पुरस्काराचे नाव

## अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कार (उत्कृष्ट क्रीडा पत्रकारिता)

सदर पुरस्कार हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवा निमित्त प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने सुरू करण्यात आला असून सदर पुरस्कार दर वर्षी देण्यात येईल.

**उद्दिष्टे :** क्रीडा क्षेत्रात खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व विविध खेळांचा शास्त्रीय दृष्टीकोन प्रसारित करण्यासाठी खेळाडूंनी व क्रीडा संघटना विविध क्रीडा आस्थापना, विद्यापीठ, महाविद्यालये,शाळा यांच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरींचा प्रचार प्रसार करणाऱ्या पत्रकारास प्रोत्साहित करण्यासाठी या पुरस्काराची रचना केली आहे.

क्रीडा क्षेत्रातील जिल्हा,राज्य,राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय पातळीवरील विविध खेळाडू,प्रशिक्षक, मार्गदर्शक, क्रीडा संघटना,शासकिय,निमशासकिय व खाजगी संस्था यांच्या कामगिरींचा प्रसार करणाऱ्या क्रीडा पत्रकारितेचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराची रचना केली आहे.

**कार्यक्षेत्र :** सदर पुरस्कार हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर च्या कार्यक्षेत्र असलेल्या सोलापूर व जिल्हा परिक्षेत्रात नोंदणीकृत व मान्यता प्राप्त माध्यमांच्या आस्थापनेवर पुर्णवेळ पत्रकार म्हणून कार्यरत असणारी व्यक्ति सदर पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहिल.

**पुरस्काराचे स्वरूप :** १. सन्मानचिन्ह २. प्रमाणपत्र (प्रमाणपत्र सानेरी फ्रेमवर्कसह व A४ सह.) असेल.

**पात्रतेचे निकष :**

१. पुरस्कारासाठी अर्जकरणाऱ्या व्यक्तिचा क्रीडा पत्रकारितेच्या क्षेत्रात किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.
२. अर्जदार हा नोंदणीकृत, दर्जेदार, प्रसार माध्यमांचा (वर्तमान पत्र, साप्ताहिक, मासिक, वृत्तवाहिनी) अधिकृत प्रतिनिधी असावा.
३. पुरस्कारासाठी अर्जदाराचे शैक्षणिक अर्हता,पत्रकारितेचा अनुभव, वैयक्तिक क्रीडा प्राविण्य,क्रीडा संघटने मधिल विविध पातळीवरील,विविध स्तरावरील केलेले कार्य क्रीडा वृत्तांकनाचे केलेले कार्य या पुरस्कारापुर्वी प्राप्त केलेले इतर पुरस्कार यांचा प्रामुख्याने विचार केला जाईल.
४. मुद्दा क्र.३ मध्ये नमुद केलेले निकष यास एकुण ७० गुणात विभागणी केली जाईल व त्यातील अधिकतम गुण प्राप्त पत्रकाराची शिफारस छाननी समिती करेल.

**क्रीडा पत्रकारिता गुणांकन तक्ता**

**कमाल १० गुण**

| | शैक्षणिक आर्हता | गुणांकन |
|---|---|---|
| १ | विशेष पदविकाप्राविण्य | ४ |
| | पद्वित्तोर पदविका | ३ |
| | पदवी | २ |
| | पदविका | १ |
| | प्रमाणपत्र आभ्यासक्रम | १ |

**कमाल १० गुण**

| | पत्रकारिता (सेवेचा) अनुभव | गुणांकन |
|---|---|---|
| २ | २५ पेक्षा अधिक | १० |
| | २० - २५ | ०७ |
| | १५ - २० | ०५ |
| | १० - १५ | ०३ |
| | ०५ - १० | ०१ |

**कमाल १० गुण**

| अ.क्र. | वैयक्तिक क्रीडा प्राविण्य | क्रमांक व गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वैयक्तिक स्पर्धेतील क्रीडा प्राविण्य | पहिला | दुसरा | तिसरा | सहभाग |
| | राष्ट्रीय स्तर | ७ | ६ | ५ | २ |
| | राज्य स्तर | ६ | ५ | ४ | १ |
| | विभागीय स्तर | ५ | ४ | ३ | - |
| | जिल्हा स्तर | ४ | ३ | २ | - |
| | तालुका स्तर | ३ | २ | १ | |

**कमाल १० गुण**

| अ.क्र. | खेळ संघटक / संघटना पदाधिकारी | पदाधिकारीव गुणांकन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | विविध स्तर क्रीडा संघटना | खेळ जनक | अध्यक्ष | उपअध्यक्ष | सचिव | सदस्य |
| | आंतरराष्ट्रीय स्तर | ९ | ८ | ७ | ६ | ५ |
| | राष्ट्रीय स्तर | ८ | ७ | ६ | ५ | ४ |
| | राज्य स्तर | ७ | ६ | ५ | ४ | ३ |
| | जिल्हा स्तर | ५ | ४ | ३ | २ | १ |
| | तालुका स्तर | ४. | ३ | २ | १ | - |

**कमाल १० गुण**

| अ.क्र. | पत्रकारितेतीलहुद्दा | हुद्दा व गुणांकन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पत्रकारिता सेवेतील हुद्दा | मुख्य.संपादक | संपादक | उप.संपादक | इडिटर | वार्ताहर |
| | आंतरराष्ट्रीय स्तर | ९ | ८ | ७ | ६ | ५ |
| | राष्ट्रीय स्तर | ८ | ७ | ६ | ५ | ४ |
| | राज्य स्तर | ७ | ६ | ५ | ४ | ३ |
| | जिल्हा स्तर | ५ | ४ | ३ | २ | १ |
| | तालुका स्तर | १ | - | - | - | - |

**कमाल १० गुण**

| अ.क्र. | वृत्ताकनातील विशेष कार्य | गुणांकन |
|---|---|---|
| ६ | वरिष्ठ स्पर्धेसाठी विशेष नियुक्ती | ६ |
| | खेळ कौशल्य/ तंत्र लेख | ५ |
| | आहार व आरोग्य लेख | ४ |
| | खेळ,खेळाडू,स्पर्धा लेख | ३ |
| | स्पर्धा वृत्ताकन | २ |

कमाल १० गुण

| अ.क्र. | प्राप्त पुरस्कार | गुणांकन | |
|---|---|---|---|
| ७ | विविध स्तर क्रीडा स्पर्धा | शासकीय | इतर |
| | आंतरराष्ट्रीय स्तर | ७ | ६ |
| | राष्ट्रीय स्तर | ६ | ५ |
| | राज्य स्तर | ५ | ४. |
| | जिल्हा स्तर | ४. | ३ |
| | तालुका स्तर | ३ | २ |

## अर्ज करताना पुरस्काराचे सर्वसाधरण नियम

१. सोलापूर शहर व जिल्हा परिसरात क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान दिलेल्या पत्रकार व्यक्तिच्या पुर्ण जिवनात हा पुरस्कार एकदाच देण्यात येईल.

२. सदर पुरस्कार प्राप्त पत्रकार पुन्हा या पुरस्कारासाठी दुसऱ्यांदा पात्र असणार नाही.

३. विद्यापीठाने दिलेल्या विहित नमुन्यामध्ये व उल्लेख केलेल्या बाबींना पुरावा देणारे कागदपत्रे, प्रमाणपत्रे, कात्रणे,छायाचित्रे व नियुक्तीपत्रे इ. जोडपत्रासह आपल्या कार्यालयीन प्रमुखाच्या शिफारशीने अर्ज विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहिल.

४. अर्ज करणारा पत्रकार निष्कलंक व कोणताही फौजदारी गुन्हा नोंद नसलेला व्यक्ति असणे आवश्यक राहिल.

५. विद्यापीठाने दिलेल्या प्रारुपनुसार अर्ज व संबंधित कागदापत्राचे जोडपत्र सादर न केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६. प्राप्त अर्जांची तज्ञ समिती मार्फत छाननी करण्यात येवून छाननी समिती गुणानुक्रमे अधिक गुण प्राप्त केलेल्या अर्जदाराची शिफारस सदर पुरस्कारासाठी करेल.

७. सदर पुरस्काराच्या निकषामध्ये एकापेक्षा अधिक व्यक्तिने विशेष योगदान व कार्यकेले असेलतर पुरस्काराच्या संख्येत वाढ करण्याचा अधिकार मा.कुलगुरू महोदयांना असेल.

८. सदर पुरस्कार दरवर्षी दि.२९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल.

९. पुरस्कार संदर्भातील निवडीचे व प्रदान करण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील.